N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): बीड  **P.S.**(ठाणे): सिरसाळा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0016  **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 08/02/2023 23:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार
   **Time Period** (कालावधी): पहर 5
   **Date From** (दिनांक पासून): 08/02/2023
   **Date To** (दिनांक पर्यंत): 08/02/2023
   **Time From** (वेळेपासून): 15:28 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 15:33 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक): 08/02/2023  **Time** (वेळ): 23:33 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 030
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 08/02/2023 23:30 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 0.5 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): डॉबाबासाहेब आंबेडकर चांक, सिरसाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महानंदा केशव गायकवाड
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोहनेर पईट,सिरसाळा,परळी,सिरसाळा,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोहनेर पईट,सिरसाळा,परळी,सिरसाळा,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9022286416

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन रावसाहेब डिघोळे | | | 1. माळी हिवरा,परळी ,सिरसाळा, बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजु लक्ष्मण किरवले | | | 1. भिमनगर, सिरसाळा,परळी, सिरसाळा,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी6000रू | 6,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

6,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी महानंदा केशव गायकवाड, वय-34 वर्ष, व्यवसाय घरकाम व मजुरी रा.पोहनेर पॉईंट, सिरसाळा ता.परळी जि. बीड मो.क्र.9022286416

मी आज दिनांक 08/02/2023 रोजी ला.प्र.वि.कार्यालय, बीड येथे श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष फिर्याद देते की, मी वरील ठिकाणची रहिवाशी असुन घरकाम व मजुरी करते.

मी दिनांक 28/01/2023 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.बीड यांचे समक्ष सिरसाळा येथे सुरक्षीत ठिकाणी तक्रार दिली की, " माझे नावे रमाई आवास योजने अंतर्गत सन-2021-2022 मध्ये घरकुल मंजुर झाले असुन घरकुलाचे दोन हप्ते माझे खात्यावर जमा झालेले आहेत. सदर घरकुलाचे बांधकामाची तपासणी करुन तिसऱ्या हप्त्याची रक्कम 40000/-रु. माझे खात्यावर जमा करण्यासाठी इंजिनियर श्री.डिघोळे हे माझ्याकडे 6000/-रु.ची मागणी करीत आहेत." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 28/01/2023 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, यांनी श्री. डिघोळे हे माझ्याकडे माझे काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक-1 श्री.तांगडे यांना [illegible] श्री.डिघोळे यांचेकडे आरगडे चौक, सिरसाळा येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यानुसार श्री शंकर शिंदे यांनी मला व दोन्ही पंचांना व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंच क्रमांक-1 श्री.तांगडे यांना श्री.डिघोळे यांचेकडे आरगडे चौक, सिरसाळा येथे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व श्री.डिघोळे यांची आरगडे चौकात भेट झाली. त्यावेळी माझेत व श्री. डिघोळे साहेब यांचेत कामाबाबत बोलणे झाले त्यांनी "मला पैशाची मागणी करुन घरकुलाचे हप्त्याची रक्कम खात्यावर जमा झाल्यावर पैसे द्या असे म्हणुन पैशाची मागणी केली. परंतु निश्चीत लाच रक्कम मागितली नाही. त्यामुळे श्री.डिघोळे यांचेविरुध्द माझे घरकुलाचा तिसरा हप्ता माझे खात्यावर जमा झाल्यानंतर पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत दिनांक 28/01/2023 रोजी लाचमागणी पडताळणी व स्थगिती पंचनामा केला आहे.

दिनांक 07/02/2023 रोजी श्री.डिघोळे साहेबांनी फोन करुन "तुमच्या खात्यावर पैसे जमा झाले असुन उद्या दिनांक 08/02/2023 रोजी 6000/-रु. घेऊन या " असे सांगितले. त्यावेळी मी श्री.शंकर शिंदे यांना फोन करुन दिनांक 08/02/2023 रोजी सिरसाळा येथे येवुन कारवाई करण्याची विनंती केली.

त्यावरुन आज दिनांक 08/02/2023 रोजी श्री.शंकर शिंदे हे पंच व स्टाफसह सिरसाळा येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आल्यानंतर मी त्यांना कळविले की, श्री.डिघोळे यांनी आज सकाळी मोबाईलवर व्हॉटसअप कॉल करुन 6000/-रु.घेऊन येण्याचे सांगितले आहे. त्यावरुन श्री शंकर शिंदे यांनी लाच रक्कम निश्चीत न झाल्याने मला व पंच क्रमांक-1 श्री बोंडे यांना श्री डिघोळे यांचेकडे पाठवुन पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. श्री.शंकर शिंदे यांनी मला व दोन्ही पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. मी श्री.शंकर शिंदे यांना कळवले की, श्री.डिघोळे यांनी भेट घेण्यासाठी त्यांना फोन करुन भेटीचे ठिकाणाबाबत विचारणा करुन घ्यावे अशी विनंती केली. त्यावरुन श्री.शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु केल्यानंतर मी श्री.डिघोळे यांना माझे मोबाईलवरुन स्पिकर ऑन करुन फोन केला असता, श्री.डिघोळे यांनी व्हॉटसअप कॉल करण्यास सांगितला. त्यानंतर मी श्री डिघोळे यांना व्हॉटस ॲप कॉल करुन स्पिकर ऑन करुन बोलले असता, श्री.डिघोळे साहेबांनी "सकाळी बोललो ना देऊन टाका, असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना चार पाच हजार देते पुढच्या हप्त्याला [illegible] असे म्हणाले त्यावर श्री.डिघोळे साहेबांनी मला सहा हजार द्या असे म्हणुन 6000/-रु. लाचेची मागणी करुन स्पष्ट निष्पन्न झाल्याने पुन्हा आरोपी लाच रक्कम घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात येण्याचे सांगितले.

त्यावरुन श्री.शंकर शिंदे यांनी श्री.डिघोळे यांचे विरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असुन वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. श्री.शंकर शिंदे यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले. श्री.शंकर शिंदे यांनी नियोजित कारवाईच्या अनुषंगाने मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकास सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक लाच रक्कम 6000/-रु. श्री.शंकर शिंदे यांचेकडे हजर केले. श्री.शंकर शिंदे यांनी 6000/-रु. त्यामध्ये 500/-रु दराच्या 12 नोटांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक 2 श्री.तांगडे यांचे करवी नमुद करुन घेतले. त्यानंतर नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझेकडील पँटचे एका खिशात ठेवल्या व मला लाच स्विकारल्यानंतर तोंडावरचा स्कार्फ सोडुन हातात धरावा असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मी, माझा मुलगा व पंच क्रमांक 1 श्री.बोंडे यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे श्री.डिघोळे यांना लाच रक्कम देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सिरसाळा येथे रवाना केले. श्री.शंकर शिंदे हे सापळा पथकासह आमचे पाठोपाठ आले. मी, मुलगा व पंच क्रमांक 1 श्री.बोंडे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सिरसाळा येथे गेलो. त्याठिकाणी श्री.डिघोळे यांना फोन केला असता, श्री.डिघोळे हे त्यांचे मोटारसायकलने चौकात आले. त्यांचे पाठीमागे एक अनोळखी व्यक्ती बसलेला होता. श्री.डिघोळे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम त्यांचे पाठीमागे बसलेल्या अनोळखी व्यक्तीकडे देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैसे त्याचेकडे नको तुम्हीच घ्या असे म्हणाले असता, श्री.डिघोळे व अनोळखी व्यक्ती पैसे न घेताच आमचेजवळुन निघुन गेले. त्यानंतर मी सापळा पथकास सुरक्षीत ठिकाणी परत जाण्याचा इशारा केला. त्यानंतर श्री.डिघोळे यांना संशय येवु नाही म्हणुन मी, माझा मुलगा व पंच क्रमांक-1 श्री.बोंडे असे माझे घरी गेलो. त्यावेळी श्री.बाळु उर्फ राजु किरवले व त्यांचेसोबत श्री.आकाश गायकवाड हे घरी आले. श्री.राजु किरवले हे मला म्हणाले की, "श्री.डिघोळे साहेबांनी पैसे माझ्याकडे द्यायचे सांगीतले आहेत तसेच माझेपण 1500/-रु. द्या असे म्हणुन किरवले यांनी लोकसेवक डिघोळे यांचेशी फोनवर संपर्क करुन माझे लोकसेवक डिघोळे यांचेशी बोलणे करुन दिले. त्यावेळी लोकसेवक डिघोळे यांनी ठरलेली रक्कम श्री. किरवले यांचेकडे देण्यास सांगितली. त्यावर मी किरवले यांना माझ्याकडे पैसे नाहीत, नंतर देतो असे म्हणाले. त्यावेळी श्री.बाळु उर्फ राजु किरवले व त्यांचेसोबत श्री.आकाश गायकवाड हे दोघुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही सुरक्षीत ठिकाणी हजर आलो. त्यावरुन मी श्री.शंकर शिंदे यांना श्री.बाळु उर्फ राजु किरवले यांचेविरुध्द पैसे देण्याची कारवाई करावी अशी विनंती केली. त्यानंतर श्री.किरवले यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. मी श्री.किरवले यांना फोन करुन स्पिकर ऑन करुन बोलले असता, श्री.किरवले यांनी श्री.डिघोळे साहेबांनी पैसे माझ्याकडे द्यायचे सांगीतले आहेत चौकात या असे सांगीतले. त्यावरुन श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंचाना पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. श्री.शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला, माझा मुलगा व पंच क्रमांक -1 श्री.बोंडे यांना लाचमागणीत ठरल्याप्रमाणे श्री. डिघोळे यांना लाच रक्कम देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सिरसाळा येथे रवाना केले. श्री.शंकर शिंदे हे सापळा पथकासह आमचे पाठोपाठ आले. मी, मुलगा व पंच क्रमांक 1 श्री.बोंडे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सिरसाळा येथे गेलो. तेथुन मी श्री.किरवले यांना फोन करुन चौकात आल्याचे सांगीतले. त्यावर श्री.किरवले व त्यांचेसोबत श्री.गायकवाड असे त्यांचेकडील मोटार सायकलवर आमचे जवळ आले. श्री.किरवले यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली असता, त्यावेळी मी लाच रक्कम 6000/- रु. माझे पर्समधुन काढुन श्री.किरवले यांचे समोर धरली असत, त्यांनी सदरची लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांचे अंगावर परिधान केलेल्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. व श्री.किरवले यांनी श्री.डिघोळे यांना व्हॉटसअप कॉल करुन पैसे मिळाल्याचे सांगितले. त्यावेळी मला नेमुन दिलेला पुर्वनियोजित इशारा 15.28 वा दरम्यान केला. इशारा प्राप्त होताच आमचे पाठोपाठ आलेले सापळा पथकातील श्री.शंकर शिंदे, पंच क्रमांक-2 श्री.तांगडे व सापळा पथकासह आमचे जवळ आले. श्री.शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला.

त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.किरवले यांना स्वत:चा व सापळा पथकातील सदस्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी पंच क्रमांक 1 श्री.बोंडे यांना पंच क्रमांक-2 श्री.तांगडे यांचेसमक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्विकारली ? तेव्हा पंच क्रमांक 1 श्री.बोंडे यांनी सांगितले की, तक्रारदार यांना श्री.किरवले यांनी लाचेची मागणी करुन लाच स्विकारुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली आहे, असा खुलासा पंच क्रमांक 1 यांनी केला. श्री.शंकर शिंदे यांनी श्री.किरवले यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बाळु उर्फ राजु लक्ष्मण किरवले, वय-28 वर्ष,

व्यवसाय-शिक्षण, रा.भिमनगर, सिरसाळा ता.परळी जि.बीड असे सांगितले. श्री.शंकर शिंदे यांनी श्री.किरवले यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे अंगावर परिधान केलेल्या पॅंटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन बाहेर काढुन श्री.शंकर शिंदे यांचे समोर धरली असता, श्री.शंकर शिंदे यांनी लाच रक्कम पंच क्रमांक -2 श्री.तांगडे यांना सदरच्या लाचेच्या नोटा ताब्यात घेऊन सापळा पुर्व कारवाई दरम्यान नमुद नोटांचे नंबर व वर्णन एकच असल्याची खात्री करण्यास सांगितली. त्यावर पंच क्रमांक 2 श्री.तांगडे यांनी सदर नोटांचे क्रमांक व वर्णन हे सापळा पुर्व कारवाई दरम्यान नमुद प्रमाणे तंतोतंत मिळुन येत असल्याचे सांगितले. श्री.शंकर शिंदे यांनी श्री.गायकवाड यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नावे आकाश भिमराव गायकवाड, वय-26 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.पोहनेर पॉईंट, सिरसाळा असे सांगितले. श्री.गायकवाड यांनी सापळा कारवाई दरम्यान माझे मुलाला 500/-रु. मागणी केली आहे तो माझे मुलाचा व त्याचा वैयक्तीक व्यवहार आहे, त्याचा या प्रकरणाशी काहीएक संबंध नाही श्री.शंकर शिंदे यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई केली. श्री.शंकर शिंदे मी, दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य व श्री.किरवले असे पुढील कारवाई कामी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे आलो. तरी श्री.सचिन रावसाहेब डिघोळे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती परळी गण-सिरसाळा (कंत्राटी) रा. माळी हिवरा ता.परळी जि.बीड यांनी माझे नावे रमाई आवास योजने अंतर्गत घरकुलाचे बांधकामाची तपासणी करुन तिसऱ्या हप्त्याची रक्कम 40000/-रु. माझे खात्यावर जमा करण्यासाठी तसेच जमा केल्याचा मोबदला म्हणुन दिनांक 28/01/2023 व दिनांक 08/02/2023 रोजी 6000/-रु. लाचेची मागणी करुन खाजगी ईसम बाळु उर्फ राजु लक्ष्मण किरवले, वय-28 वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा.भिमनगर, सिरसाळा ता.परळी जि बीड यांचे मार्फतीने लाच रक्कम 6000/-रु. दिनांक 08/02/2023 रोजी 15.28 वा. जव्हार चिकन शॉपसमोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सिरसाळा येथे पंचासमक्ष स्विकारली असता, श्री.किरवले यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी श्री.सचिन डिघोळे व श्री.किरवले यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद

13. **Action taken:** Since the above information reveals commission of **offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pardip babu exshinge() (inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (जो क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C** (आर. ओ. ए. सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pardip babu ekshing
**Rank**(पद): I (inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तीळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणाऱ्याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**